Internal circulation — Feb 1988

# भूमिहीन हक्क संरक्षण समिती : महाराष्ट्र

डॉ. आंबेडकर भवन, गोकुळदास पास्ता लेन, दादर, मुंबई-४०००१४, —फोननं. ४४८१९१

जिल्हापातळीवरीलभूमिहीनहक्क संरक्षण समितीच्या घटकपक्षसंघटनांनी २९ममार्चच्या मंत्रालयावरील धडक मोर्चाच्या तयारीला जोमाने सुरवातकरावयाची आहे. या मोर्चासाठीजी प्रचारमोहीम करावयाची त्यामध्ये मध्यवर्ती राज्य समितीने घोषित केलेल्या मागण्यांचाआवर्जून प्रचारकरणे आवश्यक आहे. यातूनएकसंध प्रचाराची परिणामकारकता साधतायेईल.

प्रत्येक जिल्हमला भू. ह. सं. स.ची स्थापना ताबडतोबीने करून या जिल्हा समितीच्या दोन निमंत्राकांची नावे, पत्ते, फोना नं. दि. २५ फेब्रुवारी पर्यंत वरील मुंबईच्या पत्त्यावर कळवावा.

धुळे जिल्ह्यांतील शिरपूर, तालुक्यात वनखात्याने आदिवासींची गावे उध्वस्त करून केलेल्या भयानक छळाच्या निषेधार्थ आणि त्यांच्या न्याय्य मागण्यासाठी [नुकसान भरपाईसह त्याच गावठाण्णावरे पुनर्वसन] भू. ह. सं. स. च्या वतीने शनिवारी दि. २० फेब्रुवारी १९८८ रोजी धुळे जिल्हा कचेरीवर मोर्चा काढण्यात येणार आहे. तेव्हापासूनच २९ मार्चच्या मुंबई "धडक मोर्चा "ची अधिकृत घोषणा व प्रचाराची सुरवात होणार आहे. आपणही जिल्हा पातळीवर प्रचाराला सुरवात करावी.

जिल्ह्यामध्ये सर्वत्र भिंती रंगवितांना देखिल मुख्यत: मध्यवर्ती समितीने केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे खालील घोषवाक्यांचा उपयोग करावा. —————

x] सर्व वस्त्यांच्या गावठाणांना अधिकृत मान्यता द्या.

x] सातबारावर भूमिहीन स्त्रियांच्या मालकी ~~कक्क~~ हक्काची नोंद करा.

x] महागाई भत्त्यासह शेतमजूरांना वाढीव किमान वेतन लागू करा.

x] फूटपाडया जातीयवादी शक्तींचा बिमोड करा.

x] सरकारी दहशतवादाशी निकाराचा संघर्ष करा.

२९ मार्चच्या मोर्चासाठी प्रत्येक जिल्हा समितीकडे मध्यवर्ती समितीकडून हॅंडबिलाचा मुख्य मजेकूर व लवकरच पाठविला जाईल. या मजकूरांत स्थानिक परिस्थितीप्रमाणे भर घालून हॅंडबिलस् छापून घ्यावीत.

आपला

(सही)

मधू मोहिते

संपर्क प्रमुख भू. ह. सं. स.